
दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ
बीड महाराष्ट्र | शुक्रवार, 17 एप्रिल 2026 | अंक क्र. 327 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4
Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com




# परळीत खासगी ट्रॅव्हल्सचा विळखा
## बसस्थानकासमोरील 'त्या' थांब्यामुळे नागरिक त्रस्त!

■ परळी वैजनाथ - नितीन ढाकणे

परळी शहरातील मुख्य रस्त्यावर असलेल्या बसस्थानकासमोर खासगी ट्रॅव्हल्सच्या अवैध थांब्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. राष्ट्रीय महामार्ग ५४८बी वरील या महत्त्वाच्या टप्प्यावर ट्रॅव्हल्स चालकांच्या मनमानीमुळे वाहतुकीचा बोजवारा उडाला असून, हा थांबा तातडीने इतरत्र हलवण्याची मागणी आता नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून प्रकर्षाने होत आहे.



अपघातांचे सत्र आणि वाहतूक कोंडीने परळीकर हैराण;

नागरिक त्रस्त राष्ट्रीय महामार्ग ५४८ बी

थांबा हटवण्याची मागणी जोर धरतेय.

अपघातांचे सत्र आणि वाहतूक कोंडीने परळीकर हैराण;

### महामार्गावरील मुख्य केंद्र, पण नियोजनाचा अभाव

■ मंठा (जालना) ते संकेश्वर (कर्नाटक) या ५७२.९ किमी अंतराच्या राष्ट्रीय महामार्ग ५४८ बी वर परळी हे एक व्यापार आणि प्रवासाचे महत्त्वाचे केंद्र आहे. अंबाजोगाई, लातूर, अक्कलकोट आणि विजयपूर यांसारख्या शहरांना जोडणारा हा मुख्य मार्ग असल्याने येथे २४ तास अवजड वाहनांची मोठी वर्दळ असते. मात्र, बसस्थानकाच्या प्रवेशद्वारासमोरच खासगी ट्रॅव्हल्स अनधिकृतपणे उभ्या केल्या जात असल्याने नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. महामार्गाचे नियम धाब्यावर बसवून येथे प्रवाशांची चढ-उतार केली जाते.

### रात्रीच्या वेळी 'ट्रॅफिक जाम'चे मुख्य केंद्र

■ दररोज सायंकाळी ५ ते रात्री १२ वाजेपर्यंत या परिसरात ट्रॅव्हल्सची प्रचंड गर्दी असते. रस्त्यावरच वाहने उभी केली जात असल्याने अनेक बाबींना सामोरे जावे लागत आहे.

### प्रशासनाचे दुर्लक्ष, सामाजिक कार्यकर्त्यांचा संताप

■ या गंभीर समस्येवर अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी वेळोवेळी आंदोलने केली, प्रशासनाला निवेदने दिली, परंतु कागदी घोडे नाचवण्यापलीकडे काहीही घडलेले नाही. "प्रशासनाचा ट्रॅव्हल्स मालकांवर वचक राहिला नाही की येथे संगनमताने हा कारभार सुरू आहे?" असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. प्रवाशांच्या सुरक्षेपेक्षा खासगी मालकांचे हित जोपासले जात असल्याचे चित्र सध्या परळीत पाहायला मिळत आहे.

" बसस्थानकासमोर उभ्या राहणाऱ्या ट्रॅव्हल्समुळे सर्वसामान्यांना रस्ता ओलांडणेही कठीण झाले आहे. खास करून महिला आणि वृद्ध प्रवाशांना या गर्दीतून वाट काढताना कसरत करावी लागते. प्रशासनाने आता तरी जागे होऊन हा थांबा शहराबाहेर मोकळ्या जागेत हलवावा, अन्यथा तीव्र जनआंदोलन छेडले जाईल."
— सामान्य नागरिक

### प्रशासनासमोर मोठे आव्हान!

■ हा रस्ता राष्ट्रीय महामार्गाचा भाग असल्याने येथील वाहतूक सुरळीत ठेवणे ही महामार्ग पोलीस आणि स्थानिक प्रशासनाची जबाबदारी आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ट्रॅव्हल्सवर दंडात्मक कारवाई करून हा थांबा कायमचा रद्द करण्याची गरज आहे. आता प्रशासन यावर काय कडक निर्बंध लादणार, हे पाहणं महत्त्वाचे आहे.

### वाहतूक कोंडी

■ रस्ता जाम होऊन अत्यावश्यक कामासाठीचा वाहने अडकून पडतात.

### अपघातांचे प्रमाण

■ अरुंद रस्ता आणि अस्ताव्यस्त उभ्या असलेल्या ट्रॅव्हल्समुळे लहान-मोठे अपघात नित्याचे झाले आहेत.


### चालकांची दादागिरी

■ अनेकदा ट्रॅव्हल्स चालक आणि कर्मचारी यांच्या दादागिरीमुळे स्थानिक नागरिक आणि प्रवाशांमध्ये वादाचे प्रसंग घडत आहेत.

### प्रशासनाचे दुर्लक्ष, सामाजिक कार्यकर्त्यांचा संताप

■ या गंभीर समस्येवर अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी वेळोवेळी आवाज उठवला, निवेदने दिली, परंतु अद्याप प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. ट्रॅव्हल्स मालकांवर कोणाचेही नियंत्रण नसल्याचे चित्र सध्या परळीत पाहायला मिळत आहे.

**महामार्गावरील मुख्य केंद्र, पण नियोजनाचा अभाव**



# नागरिकांनो सावधान! राज्यात उष्णतेचा कहर; मुंबईसह अनेक जिल्ह्यांना 'यलो अलर्ट'

■ मुंबई : वृत्तसंस्था

राज्यात गेल्या आठवड्यापासून उष्णतेचा तीव्र तडाखा जाणवत असून तापमानात मोठी वाढ झाली आहे. अनेक ठिकाणी पारा 40 अंशांच्या पुढे गेल्याने नागरिक हैराण झाले आहेत. उष्माघातामुळे आतापर्यंत दोन जणांचा मृत्यू झाल्याची नोंद झाली आहे.
या पार्श्वभूमीवर हवामान विभागाने मुंबईसह राज्यातील अनेक जिल्ह्यांसाठी 'यलो अलर्ट' जारी केला आहे. मुंबई, रायगड, रत्नागिरी, पालघर, ठाणे, अमरावती, वर्धा, धुळे, अहिल्यानगर, सोलापूर, सांगली, परभणी, छत्रपती संभाजीनगर, बुलडाणा, नाशिक, सातारा, नांदेड, अकोला या जिल्ह्यांमध्ये उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान, शनिवारपासून काही भागात अवकाळी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली असली, तरी सध्या अनेक शहरांमध्ये तापमानाचा उच्चांक नोंदवला जात आहे. सोलापूर, नागपूर, मालेगाव, धाराशिव, वर्धा येथे 43 अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले असून अकोल्यात यंदाचा उच्चांक 44 अंश सेल्सिअस इतका नोंदला गेला आहे. आरोग्य विभाग आणि डॉक्टरांकडून नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून, अत्यावश्यक कामांशिवाय बाहेर पडणे टाळावे, असे आवाहन करण्यात येत आहे. विशेषतः दुपारी 12 ते 4 या वेळेत घराबाहेर पडणे टाळावे, भरपूर पाणी प्या आणि स्वतःची काळजी घ्या, असे सांगण्यात आले आहे. मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी या किनारपट्टी भागांमध्ये उष्ण व दमट हवामान राहणार असून, इतर जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाट अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

# बीड स्थानिक गुन्हे शाखेचा दणका: नवगण राजुरी येथे धाड टाकून 2.45 लाखांचा गुटखा जप्त

■ बीड वृत्तसंस्था

जिल्ह्यात अवैध धंद्यांविरुद्ध स्थानिक गुन्हे शाखेने (LCB) आपली मोहीम तीव्र केली असून, आज दि. १६ एप्रिल रोजी नवगण राजुरी परिसरात मोठी कारवाई करण्यात आली. एका दुकानाच्या गाळ्यात साठवून ठेवलेला सुमारे २ लाख ४५ हजार ३२८ रुपये किमतीचा प्रतिबंधित गुटखा पोलिसांनी हस्तगत केला आहे.

**नेमकी घटना काय?**

मिळालेल्या माहितीनुसार, स्थानिक गुन्हे शाखेचे पथक नवगण राजुरी परिसरात गस्त घालत असताना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, येथील सरकारी दवाखान्यासमोरील एका गाळ्यात महाराष्ट्र राज्यात बंदी असलेला विविध कंपन्यांचा गुटखा विक्रीसाठी साठवून ठेवण्यात आला आहे.

पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या आदेशाने सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर आणि त्यांच्या पथकाने सकाळी १०.१५ च्या सुमारास सदर ठिकाणी छापा टाकला. या कारवाईत विकास महादेव टुले (वय ३० वर्षे, रा. नवगण राजुरी) याच्या ताब्यातून मोठ्या प्रमाणावर गुटखा साठा जप्त करण्यात आला.

### कारवाईतील पथक

■ ही कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली. या पथकात श्रीराम खटावकर, राहुल शिंदे, गोविंद राख, सोमनाथ गायकवाड, बाळू सानप, मनोज परजणे, अशफाक सय्यद आणि नितीन वडमारे यांचा समावेश होता. सध्या आरोपी विकास टुले याच्याविरुद्ध बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.




## संपादकीय

# सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाला वाघाचा आधार लाभला!

चांदोलीच्या जंगलात तीन वाघ कॅमेऱ्यात कैद झाले तरी त्यांचे वास्तव्य येथे नाही या सत्यावर उपाय शोधत ताडोबा-अंधारी-तून सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाकडे ‘तारा’ या वाघिणीचे हस्तांतर या आठवड्यात झाले. हा दक्षिण महाराष्ट्राच्या जंगलांना मिळालेला नवजीवनाचा श्वास ठरू शकतो. तो तसाच ठरावा ही महाराष्ट्राच्या वन खात्याकडून अपेक्षा आहे. गेली अनेक वर्षे वाघांशिवाय पडझड अनुभवत असलेल्या चांदोली-कोयना पट्ट्याला या एका ऑपरेशनने नवी दिशा दिली आहे. पश्चिम घाटाच्या या दगडी कड्याकपारीत वाघ या शिखर-भक्षकाचा अभाव हा केवळ पर्यावरणीय मुद्दा नव्हता, तर संपूर्ण पर्यावरण व्यवस्थेचा तोलच ढासळलेला होता. जंगलाची पुनरुत्पादन क्षमता कमी झाली होती. ‘तारा’चे आगमन हा या तुटलेल्या साखळीला पुन्हा एकत्र जोडण्याचा टप्पा आहे. वाघ असल्यावर जंगलातील प्रत्येक प्रजातीला नैसर्गिकरीत्या आपली मर्यादा कळते. त्या त्या प्राण्यांचा वेग, हालचाल आणि जीवनशैली सुधारते आणि त्यामुळे हळूहळू जंगलाची आरोग्यवस्था जोर पकडते. सह्याद्रीचा हा फायदा थेट सातारा, सांगली, कोल्हापूर या जिल्ह्यांपर्यंत पोहोचू लागेल. वाघ म्हणजे पर्यटनाचा आत्मा. दशकभरापासून चांदोली राष्ट्रीय उद्यानाच्या नावाला वैभव होते, पण वास्तवाचा त्याला आधार नव्हता. पर्यटकांना सफारीची भावना असूनही वाघ दिसत नसल्याने चांदोली आणि कोयना पट्टा पर्यटकांच्या यादीत मागे पडत होता. तारा आल्यावर पर्यटकांचा कल पुन्हा जंगलाकडे वळेल, याचा थेट फायदा स्थानिक होमस्टे, हस्तकला, ग्रामीण पर्यटन मार्गदर्शक आणि खाद्यपदार्थ उत्पादकांना होईल. सह्याद्रीत येणारा प्रत्येक पर्यटक हा स्थानिक अर्थव्यवस्थेच्या चक्राला हातभार लावणारा महत्त्वाचा दुवा आहे. त्यामुळे तेथील गावकऱ्यांना रोजगाराच्या नव्या शक्यता निर्माण होतात. पर्यावरण शिक्षण, ईको-ट्रेल्स, बर्डिंग गाइड्स, स्थानिक स्वयंसहाय्यता गट यांना यामुळे नवे दार उघडते; परंतु ‘तारा’ची गोष्ट फक्त पर्यटनाभोवती फिरत नाही. सह्याद्रीत कोयना, वारणा, कृष्णा खोऱ्यांतील जलस्रोत हे या हिरव्यागार कड्यांच्या आरोग्यावर अवलंबून आहेत. जंगल दाट असेल तर पावसाचे पाणी हळूहळू जमिनीत मुरते आणि पुढे नद्यांना नियमित प्रवाह देत राहते. पण गेल्या काही वर्षांत जंगल नष्ट होत गेल्याने पाण्याची अनियमितता वाढली. सांगली, कोल्हापूरसारख्या जिल्ह्यांमध्ये दरवर्षी पूरस्थिती तीव्र होत गेली. वाघ आल्यावर जंगलातील अतिक्रमण आणि बेकायदेशीर चराईवर प्रशासनाची नजर वाढते. वाघ असलेल्या क्षेत्रात लोक जाणीवपूर्वक सावध राहतात जंगलावर अधिक नियंत्रण ठेवले जाते. यामुळे जलस्रोतांचे दीर्घकालीन संरक्षण होते आणि नैसर्गिक नियंत्रण मिळते. हवामान बदलामुळे पावसाची स्वरूपे अधिक आक्रामक होत असताना अशा स्थिर जंगलाची गरज अधिकच वाढली आहे. या प्रकल्पाचा विस्तारित परिणाम कोकण आणि उत्तर कर्नाटकापर्यंतही जाणवेल. सह्याद्री, अंबोली, दांडेली हा नैसर्गिक प्राणी कॉरिडॉर इतिहासात जिवंत होता; पण शहरीकरण, रस्ते, खाणी, विद्युत प्रकल्प यांनी त्याच तुकडे-तुकडे केले. ‘तारा’सारखे वाघ स्थलांतरित झाल्यावर या कॉरिडॉरकडे पुन्हा एकदा शास्त्रीय दृष्टीने पाहण्याची गरज निर्माण होते. वाघांची ये-जा होत असेल तर हत्ती, गवा, अस्वल, वनकुत्रा यांच्या हालचालीही सुव्यवस्थित राहतात. जैवविविधता फक्त वाघावर अवलंबून नसली तरी वाघ हा त्या विविधतेचा मुख्य सूचक असतो. कोकणातील जंगलांवर खाणकाम किंवा अनियोजित रस्त्यांचे दडपण वाढले की अशा वाघ प्रकल्पांमुळे पर्यावरणीय अनुमतीच्या निकषांत काटेकोरपणा येतो. मात्र या प्रकल्पात धोकेही कमी नाहीत. वाघाला हवा असलेला अखंड जंगल पट्टा आज अनेक भागांत तुटलेला आहे. चांदोली, कोयना, राधानगरीला जोडणारा पट्टा अजूनही अनेक ठिकाणी अरुंद किंवा व्यत्यय आणणारा आहे. गावांची वाढ, व्यावसायिक शेती, जंगल रस्ते या सगळ्यामुळे वाघाला फिरण्यासाठी हवी असलेली शांतता कमी होते.

मानवी-वन्यजीव संघर्षाची शक्यता वाढते. जनावरांवर हल्ले झाले तर स्थानिक लोकांचा विरोध उफाळू शकतो. म्हणूनच जलद आणि सन्मान्य पद्धतीने भरपाई देणारी यंत्रणा, सतत जनजागृती आणि गावकऱ्यांचा थेट सहभाग हे तीन स्तंभ अनिवार्य आहेत, तर दुसरीकडे, सह्याद्रीत शिकार प्राणी पुरेसे नसल्यास वाघ टिकू शकणार नाही. ताडोबात विपुल असलेले सांबर-गवा सह्याद्रीत कमी प्रमाणात दिसतात, त्यामुळे शास्त्रीय पद्धतीने त्यांच्या वाढीकडे लक्ष द्यावे लागेल. या सगळ्यांवर शेवटचा आणि सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे राजकीय इच्छाशक्ती. प्रशासनातील सातत्य नसले तर अशा प्रकल्पाचे भवितव्य धोरण बदलांमध्ये अडकते. तरीही एक गोष्ट निर्विवाद आहे, वाघाचे आगमन म्हणजे निसर्गाचा आत्मविश्वास परत येणे. वाघ असताना जंगलातील वृक्षांचे पुनरुज्जीवन अधिक वेगाने होते, कारण शाकाहारी प्राण्यांचा ताण कमी होतो. दाट जंगलाने कार्बन शोषण वाढते आणि हवामान बदलाचे दडपण कमी करण्याची नैसर्गिक क्षमता वाढते. झरे आणि ओहोळ पुन्हा जिवंत होतात. पक्षी, साप, कासव, कीटक, औषधी वनस्पती यांची संख्या वाढते. हे सर्व मिळून एक मजबूत परिसंस्था तयार करते आणि ही परिसंस्था हवामान बदलाच्या संकटात माणसाला आधार देणारी सर्वात शक्तिशाली ढाल आहे. ऑपरेशन ‘तारा’ हे म्हणून केवळ एका वाघिणीचे स्थानांतरण नसून संपूर्ण सह्याद्रीचा पुनर्जन्म आहे. दक्षिण महाराष्ट्राच्या पर्यावरणीय आणि आर्थिक भविष्यातील सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे प्रकल्पाला मिळणारा लोकसहभाग, वैज्ञानिक व्यवस्थापन आणि राजकीय बांधिलकी. वाघाचे पाऊल सातारा, सांगली, कोल्हापूरच्या मातीत पुन्हा उमटले तर तो निसर्गाचा विजय असेल आणि हवामान बदलाच्या अंधाऱ्या भावी दिवसांना तोंड देण्यासाठी या प्रदेशाला वाघाच्या रूपाने मिळालेला सर्वात मोठा मित्र असेल. फक्त तो मित्र जंगलातच राहिला पाहिजे माणसांच्या घरापर्यंत त्याला येऊ न देणे ही जबाबदारी वन विभागाची!

## लोकरंग



### साप्ताहिक संवाद
### जीवामृत शेतजमिनीसाठी संजीवनी

राज्यातील शेतकरी हा अवकाळी पाऊस आणि ओल्या तसेच कोरड्या दुष्काळामुळे अगोदरच त्रस्त आहे. त्यातून उभ्या पिकांची हानी आणि दुबार पेरणीच्या साठी सावकारी कर्ज आणि हे कर्ज न फेडता आल्यामुळे आत्महत्या हे सत्र सुरु आहे. परंतु त्याच वेळी शेतातील मातीमध्ये अनेक रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे जमिनी देखील नापीक होताना दिसताहेत. ज्यामुळे अशा जमिनी शेतीसाठी उपयुक्त राहत नाहीत. म्हणूनच,रासायनिक खतांचा वापर कमी करून नापीक जमिनींना सुपीक बनविणारी संजीवनी अर्थात जीवामृत खतांचा पर्याय सरकारने तपासला आहे. याच अनुषंगाने राज्याच्या पशुसंवर्धन विभागाचे अतिरिक्त आयुक्त डॉ. शीतलकुमार मुकणे यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

### नापीक जमिनीसाठी राज्यसरकारने जीवामृत खतांचा पर्याय आणला आहे त्याबद्दल?

शेतकऱ्यांचे रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करून सेंद्रिय शेतीला बळ देणारे जीवामृत हे खत राज्य सरकारच्या पशुसंवर्धन विकास मंडळाकडून निर्माण करण्यात आले आहे. पुणे येथील शासकीय पशुपैदास केंद्र तायवडे येथे या जीवामृताची चाचणी करण्यात आली. या चाचणीत नापीक जमिनीचा पोत कमालीचं वाढत असल्याचे निरीक्षण नोंदविले गेले. जीवामृत खताचा वापर करून मका हे सकस पीक घेण्यात आले असून पुढील काळात आणखी क्षेत्रावर त्याचा वापर करून हे खत शेतकऱ्यांना माफक दारात उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

### तायवडे येथील शेतजमिनीवर राबविलेल्या जीवामृताच्या प्रयोगाचे फलित नेमके काय होते?

पुण्यातील तायवाडे येथे मक्याचे उत्पादन घेण्यात आले असून संतुलित वापरामुळे जोमदार पीक मिळाल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे. तायवाडे येथे राबविण्यात आलेला पथदर्शी प्रकल्प पशुधन विकास अधिकारी डॉ. अमोल आहेर आणि कृषी सहायक राजवर्धन घोगरे यांचं नेत्तृत्वात पार पडला. या प्रकल्पात जीवामृताच्या वापरामुळे जमिनीतील सूक्ष्म जिवाणूंची संख्या अवधून पिकांची रोगप्रतिकारक शक्ती वाढल्याचे निदर्शनास आले. हे खत जमिनीची सुपीकता वाढवून जमीन विषमुक्त करण्यास मदत करणारे आहे .

### या जीवामृत खताचे वितरण शेतकऱ्यांपर्यंत कसे केले जाणार आहे?

महाराष्ट्र पशुधन विकास मंडळाकडून या जीवामृत खताची निमिर्ती करण्यात अली असून गाईचे शेण,गोमूत्र,गूळ ,बेसन आणि शेतातील माती यापासून निर्माण करण्यात आलेलं आहे. शेतकऱ्यांसाठी हा उत्तम पर्याय उपलब्ध झाला असून कृषी निविष्ठा आणि औषधांचा खर्च देखील यामुळे कमी होणार आहे. शेतकऱ्यांची मागणी लक्षात घेऊन जीवामृताची दर निश्चिती करून ते शेतकऱ्यांसाठी विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात येईल.






### चला पर्यटनाला
### कोल्हापुरातील रामतीर्थ धबधबा

कोल्हापूर हे प्राचीन संस्थानांपैकी एक आहे ज्यात मराठा काळातील समृद्ध वारसा आहे. कोल्हापूर हे महाराष्ट्रातील पर्यटन स्थळे तसेच हस्तकलेसाठी, विशेषतः कोल्हापुरी चप्पलसाठी ओळखले जाणारे शहर आहे. दरवर्षी हजारो भारतीय आणि विदेशी पर्यटक येथे भेट देण्यासाठी येतात. कोल्हापूरच्या आजरा तालुक्यातील हिरण्यकेशी नदीच्या काठी उतरलेला, रामतीर्थ धबधबा हा त्याच्या अतुलनीय शांततेसाठी आणि सौंदर्यासाठी लोकप्रिय असलेला नैसर्गिक धबधबा आहे. कोल्हापूरच्या मुख्य पर्यटन स्थळामध्ये समाविष्ट असलेल्या या ठिकाणाचा वापर बहुतांशी सहलीसाठी आणि शहराच्या गजबजाटापासून दूर एकांतात वेळ घालवण्यासाठी केला जातो. तुम्हालाही तुमच्या दैनंदिन व्यस्त जीवनापासून आणि शहरातील गर्दीपासून दूर राहून तुमच्या कुटुंबासह, मित्रांसोबत किंवा प्रियकरासह एकांतात वेळ घालवायचा असेल तर तुम्ही रामतीर्थ धबधब्याला भेट देऊ शकता. या परिसरात अशी अनेक मंदिरे आहेत जिथे यात्रेकरूंची नेहमीच गर्दी असते.सागरेश्वर वन्यजीव अभयारण्य हे कोल्हापूर जिल्ह्यातील एक अद्वितीय संरक्षित क्षेत्र आहे जे मानवनिर्मित जंगल आहे. सुमारे 11 चौरस किलोमीटर परिसरात पसरलेल्या या अभयारण्यमध्ये कृत्रिमरीत्या ॲम्फीथिएटरमध्ये वन्यजीवांची ओळख करून देण्यात आली आहे. अभयारण्यामध्ये समृद्ध वनस्पती आणि प्राणी आहेत ज्यामुळे ते कोल्हापुरात भेट देण्याच्या सर्वोत्तम ठिकाणांपैकी एक बनते आणि दरवर्षी हजारो पर्यटक येतात.

नोंद

उद्योग विकासातील योगदानाच्या सन्मानार्थ पोष्टाचे विशेष टपाल कव्हर

एमव्हीआयआरडीसी वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबईने देशातील व्यापार आणि उद्योग विकासातील योगदानाच्या सन्मानार्थ इंडिया पोस्टतर्फे विशेष टपाल कव्हर प्राप्त केले आहे. भारताच्या जागतिक व्यापार प्रवासातील आपल्या पाच दशकांहून अधिक काळाच्या भूमिकेचा उत्सव साजरा करत, डब्ल्यूटीसी मुंबईने ही उपलब्धी साजरी करण्यासाठी एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते. गेल्या अनेक दशकांपासून, या संस्थेने भारतीय व्यवसायांना जागतिक बाजारपेठेशी जोडण्यात, व्यापाराला चालना देण्यात आणि आर्थिक भागीदारी वाढविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबईचे अध्यक्ष, डॉ. विजय कलंत्री म्हणाले, “आम्हाला डब्ल्यूटीसी मुंबईच्या प्रवासावर चिंतन करताना प्रचंड अभिमान वाटतो. या केंद्राची स्थापना भारतरत्न एम. विश्वेश्वरैया यांच्या दूरदर्शी आदर्शांवर झाली, ज्यांचा नियोजन, नावीन्य आणि उद्यमशीलतेद्वारे राष्ट्र उभारणीवर विश्वास होता. भारताची व्यापारी राजधानी असलेल्या मुंबईला व्यापार आणि वाणिज्य क्षेत्राचे जागतिक केंद्र म्हणून स्थापित करण्याच्या दूरदृष्टीने डब्ल्यूटीसी मुंबईची स्थापना करण्यात आली.'' प्रमुख भाषणात, महाराष्ट्र मंडळाचे मुख्य पोस्टमास्टर जनरल श्री. अमिताभ सिंह यांनी भारताची व्यापार परिसंस्था मजबूत करण्यात डब्ल्यूटीसी मुंबईने बजावलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेची दखल घेतली. ते म्हणाले, “डब्ल्यूटीसी मुंबईसारख्या संस्था व्यावसायिक देवाणघेवाणीसाठी अर्थपूर्ण व्यासपीठ तयार करतात, जे व्यापार आणि समृद्धीला चालना देण्यासाठी अपरिहार्य आहेत.”

■ संकलन –संयोजन सुबोध रणशेवरे

# शालेय जीवनापासून स्पर्धा परीक्षेची तयारी
# मिशन आयएएसचा पुढाकार

विद्यार्थ्यांना शालेय जीवनामध्येच स्पर्धा परीक्षा देण्याची ओढ लागावी व त्या दृष्टिकोनातून त्यांनी समर्थपणे तयारी करावी यासाठी संपूर्ण भारतामध्ये स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एक 18 महिन्याचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे.

या प्रशिक्षणामध्ये वर्ग पाच ते वर्ग बारा चे विद्यार्थी सहभागी होऊ शकतात. या प्रशिक्षणाचे माहितीपत्रक प्राप्त करण्यासाठी विद्यार्थ्यांनी पालकांनी किंवा अध्यापकांनी डॉ पंजाबराव देशमुख आयएएस अकादमीचे मिशन आयएएस या प्रकल्पाचे संचालक प्रा. डॉ.नरेशचंद्र काठोळे यांच्याशी 9890967003 या क्रमांकावर संपर्क साधावा.

डॉ. पंजाबराव देशमुख अकादमी, अमरावती 25 Years मिशन IAS Silver Jubilee

मिशन आयएएस हा संपूर्ण भारतातील लोकप्रिय व प्रतिष्ठित प्रकल्प असून या प्रकल्पामध्ये फक्त एक रुपया प्रतिदिन इतक्या अल्प शुल्कामध्ये विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे ऑफलाइन प्रशिक्षण देण्यात येते. शिवाय याच शुल्कामध्ये विद्यार्थ्यांना पुस्तके सराव परीक्षांची पुस्तके सराव परीक्षा अंतिम परीक्षा गुणपत्रिका व प्रमाणपत्र हे प्रदान करण्यात येते. या उपक्रमामध्ये आतापर्यंत 23 हजार 500 मुले सहभागी झाले असून गुजरात व राजस्थानमध्ये देखील हा उपक्रम सुरू आहे. एक रुपयामध्ये आयएएसचे प्रशिक्षण हे मराठी इंग्रजी व सेमी या तीन भाषांमधून देण्यात येत असून त्याला महाराष्ट्रातील 24 जिल्ह्यातून उत्तम प्रतिसाद आहे.

शालेय जीवनात पासून आयएएस या परीक्षेची तयारी करणाऱ्या बाहेरगावच्या मुलांना व्यवस्थित मार्गदर्शन मिळावे यासाठी मिशन आयएएस ज्यांच्या बरोबर काम करते त्या दिल्लीच्या मालुका आयएएसने पाचवी ते बारावी या वर्गासाठी ऑनलाईन प्रशिक्षण आखले असून त्याला नाममात्र 2500 एवढे अल्प शुल्क 18 महिन्यांसाठी आहे. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांना आय ए एस बाबत सर्व प्रकारचे मार्गदर्शन करण्यात येणार आहे.



मिशन आयएएसमध्ये आतापर्यंत 373 सनदी व राजपत्रित अधिकारी सहभागी झालेले आहेत. याशिवाय मिशन आयएएसने संपूर्ण भारतात 18200 विनामूल्य स्पर्धा परीक्षा कार्यशाळा घेऊन एक विक्रम केला आहे. याशिवाय मिशन आयएएसने वेळोवेळी स्पर्धा परीक्षेला उपयोगी पडणारी 73 पुस्तके प्रकाशित केलेली आहेत. याशिवाय मिशन तर्फे दरवर्षी उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये मे महिन्यामध्ये सात दिवसांचे स्पर्धा परीक्षा संस्कार शिबीर देखील घेण्यात येते. यावर्षीचे शिबीर हे अमरावती जवळील वलगाव येथील सिकची रिसॉर्ट या भव्य रिसॉर्ट मध्ये आयोजित करण्यात आले आहे.

मिशन आयएएस 26 वर्षापासून हे काम करीत असून यावर्षी संस्थेचा रौप्य महोत्सव आहे. मिशनने महाराष्ट्र शिवाय इतरही राज्यात स्पर्धा परीक्षां बाबत व्यापक जनजागृती केली असून हिंदी भाषिक प्रांतातही मिशन आयएएसला चांगला प्रतिसाद आहे. शालेय जीवनापासून स्पर्धा परीक्षेची तयारी केली तर विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व तत्पर तेजस्वी व तपस्वी होते. स्पर्धा परीक्षमध्ये त्याला अपयश आले तरी तो कुठल्याही क्षेत्रात गेला तरी त्याचे व्यक्तिमत्व इतके चांगले होते की तो ज्या क्षेत्रात जाईल त्या क्षेत्रात आपले भवितव्य उज्वल करू शकतो. हीच संकल्पना डोळ्यासमोर ठेवून या अभ्यासक्रमाची आखणी केलेली आहे.

■ प्रा. डॉ.नरेशचंद्र काठोळे संचालक

■ मिशन आयएएस अमरावती कॅम्प 9890967003

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

'जागतिक वारसा दिन'

# वारसा म्हणजे संस्कृतीचा श्वास : डॉ. राजेंद्र बगाटे

**दरवर्षी १८ एप्रिल हा दिवस 'जागतिक वारसा दिन' म्हणून साजरा केला जातो आणि या दिवसाचे महत्त्व केवळ औपचारिक स्मरणापुरते मर्यादित न राहता, मानवी सभ्यतेच्या उत्क्रांतीतील सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि नैसर्गिक संपदेचे महत्त्व अधोरेखित करणारा एक चिंतनाचा दिवस म्हणून पाहणे आवश्यक ठरते. मानवी समाजाने हजारो वर्षांच्या कालखंडात निर्माण केलेल्या परंपरा, मूल्ये, स्थापत्यकला, कला, ज्ञानप्रणाली आणि सामाजिक संस्था यांचा एकत्रित संच म्हणजे वारसा होय. हा वारसा केवळ भूतकाळाचा अवशेष नसून वर्तमानातील ओळखीचा पाया आणि भविष्याच्या विकासाचा मार्गदर्शक आहे. त्यामुळे जागतिक वारसा दिन हा आपल्याला आपल्या मुळांशी पुन्हा जोडणारा, आपली ओळख दृढ करणारा आणि जतनाची जबाबदारी जाणवून देणारा एक अत्यंत महत्त्वपूर्ण दिवस आहे.**

वारसा या संकल्पनेचा व्यापक विचार केला असता, त्यात भौतिक आणि अमूर्त अशा दोन्ही घटकांचा समावेश होतो. भौतिक वारशामध्ये किल्ले, मंदिरे, विहारे, स्मारके, गुहा, ऐतिहासिक वास्तू, पुरातत्त्वीय स्थळे, लेण्या आणि निसर्गसंपन्न क्षेत्रांचा समावेश होतो. या स्थळांमध्ये त्या त्या काळातील स्थापत्यकौशल्य, तांत्रिक प्रगती आणि सांस्कृतिक दृष्टिकोन प्रतिबिंबित होतो. दुसरीकडे अमूर्त वारशामध्ये भाषा, लोकपरंपरा, सण-उत्सव, लोककला, संगीत, नृत्य, जीवनशैली आणि श्रद्धा यांचा समावेश होतो. हे अमूर्त घटक समाजाच्या सांस्कृतिक जडणघडणीचे प्रतीक असतात आणि ते समाजाच्या मानसिकतेचे, विचारसरणीचे आणि जीवनमूल्यांचे दर्शन घडवतात. या दोन्ही प्रकारचा वारसा एकमेकांशी परस्परपूरक असून समाजाच्या ओळखीचा पाया तयार करतात.

भारतीय वारशाचा विचार केला तर त्याची व्याप्ती आणि वैविध्य हे जगातील इतर कोणत्याही देशाच्या तुलनेत अधिक समृद्ध आहे. प्राचीन सिंधू संस्कृतीपासून सुरू झालेला हा प्रवास वैदिक, बौद्ध, जैन, मौर्य, गुप्त, चालुक्य, मुघल आणि मराठा अशा विविध कालखंडांतून पुढे सरकत आधुनिक भारतापर्यंत पोहोचतो. प्रत्येक कालखंडाने आपल्या संस्कृतीचे, कलेचे आणि विचारांचे वेगळे योगदान दिले आहे. भारतातील विविध धर्म, भाषा, जाती आणि परंपरा यांनी मिळून एक बहुरंगी सांस्कृतिक पट तयार केला आहे. त्यामुळे भारतातील वारसा स्थळे ही केवळ पर्यटनाची साधने नसून ती इतिहासाची साक्ष देणारी जिवंत कागदपत्रे आहेत.

महाराष्ट्राच्या संदर्भात पाहिले तर येथील वारसा हा अत्यंत प्रेरणादायी आहे. सह्याद्रीच्या डोंगररांगांमध्ये उभे असलेले किल्ले हे स्वराज्याच्या संघर्षाचे आणि शौर्याचे प्रतीक आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेले हे किल्ले आजही आत्मविश्वास आणि स्वाभिमानाची प्रेरणा देतात. अजिंठा-वेरूळ लेण्यांतील शिल्पकला आणि भित्तिचित्रे प्राचीन भारतीय कलेचे उत्कृष्ट उदाहरण आहेत. त्याचप्रमाणे वारकरी संप्रदाय, भजन-कीर्तन, लोकनृत्य आणि सण-उत्सव हे महाराष्ट्राच्या अमूर्त वारशाचे महत्त्वाचे घटक आहेत. या सर्व गोष्टी समाजाच्या सांस्कृतिक ओळखीला आकार देतात आणि सामाजिक एकात्मता वाढवतात.



आजच्या आधुनिक युगात वारसा जतन करणे ही एक मोठी आव्हानात्मक जबाबदारी बनली आहे. शहरीकरण, औद्योगिकीकरण आणि वाढते पर्यटन यामुळे अनेक वारसा स्थळांवर ताण निर्माण झाला आहे. अतिक्रमण, प्रदूषण, दुर्लक्ष आणि अनियंत्रित विकास यामुळे अनेक ऐतिहासिक स्थळांचे नुकसान होत आहे. काही ठिकाणी तर वारसा स्थळांचे मूळ स्वरूपच नष्ट होत आहे. यामागे केवळ शासनाची कमतरता नसून समाजातील जागरूकतेचा अभावही कारणीभूत आहे. अनेकदा लोक वारसा स्थळांकडे केवळ मनोरंजनाच्या दृष्टीने पाहतात आणि त्याच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक महत्त्वाकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे वारसा जतनासाठी समाजातील प्रत्येक घटकाने सजग होणे आवश्यक आहे.

वारसा संवर्धनासाठी शिक्षण हे अत्यंत प्रभावी साधन आहे. विद्यार्थ्यांना लहानपणापासूनच आपल्या वारशाचे महत्त्व पटवून दिल्यास त्यांच्या मनात जतनाची भावना निर्माण होते. इतिहासाचा अभ्यास केवळ पाठांतरापुरता मर्यादित न ठेवता, त्यामागील सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भ समजावून सांगणे आवश्यक आहे. शैक्षणिक सहलींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वारसा स्थळांचा प्रत्यक्ष अनुभव दिल्यास त्यांचे ज्ञान अधिक समृद्ध होते आणि त्यांच्या मनात वारशाबद्दल आदर निर्माण होतो. शिक्षणाच्या माध्यमातून निर्माण झालेली ही जाणीव भविष्यात वारसा संवर्धनासाठी उपयुक्त ठरते.

तंत्रज्ञानाच्या युगात वारसा जतनासाठी नवीन साधने उपलब्ध झाली आहेत. डिजिटल दस्तऐवजीकरण, आभासी



पर्यटन, त्रिमितीय प्रतिकृती आणि डिजिटल संग्रहालयांच्या माध्यमातून वारशाचे जतन अधिक प्रभावीपणे करता येते. यामुळे जगभरातील लोकांना विविध वारसा स्थळांची माहिती सहजपणे उपलब्ध होते. तसेच आपत्तीच्या काळात या डिजिटल नोंदींचा उपयोग वारसा पुनर्स्थापनासाठी होऊ शकतो. त्यामुळे तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून वारसा जतनाची प्रक्रिया अधिक सक्षम करता येते.

पर्यटन आणि वारसा यांचा संबंध अत्यंत निकटचा आहे. वारसा स्थळांमुळे पर्यटनाला चालना मिळते आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी मिळते. परंतु अनियंत्रित पर्यटनामुळे वारसा स्थळांचे नुकसान होण्याची शक्यता असते. त्यामुळे शाश्वत पर्यटनाची संकल्पना स्वीकारणे आवश्यक आहे. पर्यटकांनी जबाबदारीने वागून वारसा स्थळांचे संरक्षण करणे गरजेचे आहे. स्थानिक समुदायांचा सहभाग वाढवून पर्यटन व्यवस्थापन अधिक प्रभावी करता येते. वारसा जतन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची नैतिक जबाबदारी आहे. आपल्या दैनंदिन जीवनातही आपण वारसा जतनासाठी योगदान देऊ शकतो. घरातील परंपरा जपणे, स्थानिक कला आणि संस्कृतीला प्रोत्साहन देणे, वारसा स्थळांवर स्वच्छता राखणे आणि त्यांचे संरक्षण करणे या छोट्या कृतीतून मोठा बदल घडवून आणता येतो. समाजातील प्रत्येक घटकाने या कार्यात सहभागी झाल्यास वारसा जतनाची प्रक्रिया अधिक प्रभावी होईल. जागतिक वारसा दिनाच्या निमित्ताने आपण आपल्या वारशाचे पुनर्मूल्यांकन करण्याची गरज आहे. आपण कोण आहोत, आपल्या समाजाची ओळख काय आहे आणि भविष्यात आपण कोणत्या दिशेने जावे याचा विचार या दिवशी करणे आवश्यक आहे. वारसा हा केवळ भूतकाळाचा ठेवा नसून तो आपल्या भविष्याचा मार्गदर्शक आहे. त्यामुळे त्याचे जतन करणे ही आपल्या अस्तित्वाशी निगडित जबाबदारी आहे.

आजच्या पिढीसमोर सर्वात मोठे आव्हान म्हणजे आधुनिकतेच्या प्रवाहात आपली सांस्कृतिक ओळख टिकवून ठेवणे. जागतिकीकरणामुळे विविध संस्कृतींचा प्रभाव वाढत असताना आपली परंपरा आणि मूल्ये जपणे अधिक कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत वारसा हा आपल्या ओळखीचा आधार ठरतो. त्यामुळे वारसा जतन करणे म्हणजे केवळ इतिहास जपणे नव्हे, तर आपल्या अस्तित्वाचे रक्षण करणे होय.

शेवटी असे म्हणता येईल की जागतिक वारसा दिन हा आपल्याला आपल्या भूतकाळाशी जोडणारा, वर्तमानाला दिशा देणारा आणि भविष्याला प्रेरणा देणारा एक महत्त्वपूर्ण दिवस आहे. या निमित्ताने आपण सर्वांनी वारसा जतनाची प्रतिज्ञा करावी आणि आपल्या कृतीतून त्याची अंमलबजावणी करावी. कारण जे समाज आपला वारसा जपतात, तेच समाज खऱ्या अर्थाने समृद्ध आणि सक्षम बनतात. वारसा हा आपल्या पूर्वजांनी दिलेला अमूल्य ठेवा आहे आणि तो पुढील पिढ्यांसाठी जतन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.

**■ डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**



# डॉ.आंबेडकर यांच्या विचाराने जीवन समृद्ध बनते : अनिल रोकडे

## कासेगावात डॉ. बाबासाहेबांना अभिवादन

**■ शिराळा /प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दीन दलितांचे कैवारी होते. ते थोर अर्थशास्त्रज्ञ आणि कायदे पंडित होते .भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार होते. संपूर्ण जगाला वंदनीय ठरलेली राज्यघटना डॉ. आंबेडकर यांनी देशाला बहाल केली. त्यांच्या संविधानानुसार भारत देशाचा कारभार सुरू आहे, असे प्रतिपादन वरिष्ठ मुख्याध्यापक अनिल रोकडे यांनी केले. कासेगाव तालुका वाळवा येथील जिल्हा परिषद शाळा नं.१ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती संपन्न झाली. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी डॉ.आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन वरिष्ठ मुख्याध्यापक अनिल रोकडे, केंद्रप्रमुख वसंत शिंगारे, वैशाली पाटील, समीना मुल्ला, उज्वला हरपळकर, संध्या सपकाळ, सुप्रिया पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.विद्यार्थ्यांची भाषणे झाली.

यावेळी केंद्रप्रमुख वसंत शिंगारे म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांचे जीवन उंचवण्यासाठी आयुष्यभर संघर्ष केला. चवदार तळ्याचा सत्याग्रह केला. त्यांचा आदर्श आपण घेतला पाहिजे. त्यांनी घालून दिलेल्या संविधानानुसार आपण चालले पाहिजे. त्यांचे विचार आत्मसात केले पाहिजेत व आपले जीवन सुखी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. यावेळी शाळेतील शिक्षक, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य व विद्यार्थी उपस्थित होते. फोटोओळी : कासेगाव येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करताना वैशाली पाटील, उज्वला शिंदे, पार्वती शिंगारे

# एमपीएससीचे मा. अध्यक्ष यांच्या मिशन आयएएसला शुभेच्छा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे माजी अध्यक्ष अमरावती जिल्ह्याचे सुपुत्र व स्थानिक सुप्रसिद्ध अशा शासकीय ज्ञान विज्ञान संस्थेचे म्हणजे विदर्भ महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी तसेच सुप्रसिद्ध आयपीएस अधिकारी श्री वसंतराव देशमुख यांनी मिशन आयएएसला लेखी शुभेच्छा पाठविल्या आहेत. या शुभेच्छांमध्ये ते म्हणतात की जेव्हा आम्ही शिकत होतो तेव्हा विदर्भात स्पर्धा परीक्षा हा विषय दुर्लक्षित होता. आम्हाला स्पर्धा परीक्षांबाबत काहीही माहिती नव्हती. आम्ही अंधारात धडपडत होतो. परंतु मिशन आय.ए.एस. चे संचालक प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे यांनी संपूर्ण महाराष्ट्रमध्ये स्पर्धा परीक्षेच्या बाबतीत जी जनजागृती केलेली आहे त्यामुळे महाराष्ट्रातील तरुण गेल्या 26 वर्षात चांगला तयार झालेला आहे. सतर्क झालेला आहे. याचे श्रेय निश्चितच मिशन आयएएसला द्यावे लागेल. मिशन आयएएसचे सगळेच उपक्रम चांगलेच असतात. मी वेळोवेळी या उपक्रमांना शुभेच्छा देत असतो. मिशन आयएएसने 16 मे ते 22 मे या दरम्यान अमरावतीच्या सिकची रिसॉर्टमध्ये होणाऱ्या निवासी स्पर्धा परीक्षा संस्कार शिबिराचे निमंत्रण मला पाठविले ही माझ्यासाठी खरोखरच आनंदाची बाब आहे. मला देखील माझ्या मातृभूमी मध्ये येणे आवडते.



स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी कार्यरत असणाऱ्या विद्यार्थ्यांना माझी एक सूचना आहे. त्यांनी त्यांचा बी प्लॅन तयार ठेवला पाहिजे .प्रत्येकच विद्यार्थ्याला यश मिळतेच असे नाही आणि त्याचा बी प्लान तयार नसेल तर त्याला अवघड होऊ शकते म्हणून बी प्लॅन डोळ्यासमोर ठेवूनच स्पर्धा परीक्षेचा अभ्यास केला पाहिजे. आमच्या तेव्हाच्या तुलनेत आजचा विद्यार्थी खरोखरच भाग्यवान आहे .कारण त्याला स्पर्धा परीक्षेला बसण्यासाठी सर्व प्रकारचे मार्गदर्शन सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध आहेत. मी या सर्वांना शुभेच्छा देतो आणि भविष्यात त्यांना माझी काही मदत लागली तर ते करण्यास मी सदैव तत्पर आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माजी अध्यक्ष असलेल्या श्री वसंतराव देशमुख यांनी मिशन आयएएसच्या रौप्य महोत्सवी वर्षात दिलेल्या ह्या शुभेच्छा सर्वांना समाधान देणाऱ्या आहेत. श्री वसंतराव देशमुख हे अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर येथे राहणारे असून खूप विपरीत परिस्थितीमध्ये त्यांनी लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण करून महाराष्ट्र शासनाची व केंद्र शासनाची प्रामाणिकपणे सेवा केली आहे. एक कर्तव्यदक्ष सनदी अधिकारी म्हणून त्यांचा नावलौकिक आहे.

**■ प्रा.डॉ.नरेशचंद्र काठोळे संचालक मिशन आयएएस अमरावती कॅम्प 9890967003**

# रस्ता दुरुस्तीप्रश्नी रखरखत्या उन्हात युवकांचे आंदोलन डिवायएफआय चे बेमुदत ठिय्या आंदोलन




**■ परळी / प्रतिनिधी**

अंबाजोगाई - मोहा - सिरसाळा व परळी - नागापूर - बोधेगाव - मोहा - सर्फराजपूर या दोन रस्त्यांचे तात्काळ अद्यवतीकरण करा या मागणीसाठी भारताच्या लोकशाहीवादी युवक संघटनेने रखरखत्या उन्हात म्हतारगाव फाटा कान्नापूर या ठिकाणी बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू केले असून वारंवार निवेदने देऊन ही काम होत नसल्याने परिसरातील युवकांनी ठिय्या आंदोलन करण्याचे पाऊल उचलले आहे.

परळी तालुक्यातील मोहा गावाला अंबाजोगाई आणि परळी या दोन्ही तालुक्याला जोडणा-या राज्य महामार्गाची अतिवृष्टीमुळे चाळणी होऊन या मार्गावरील पूल देखील खचले गेले आहेत. आरोग्य, शिक्षण, व्यापार आदी विविध कारणाने या मार्गावरुन हजारो नागरिकांची वर्दळ असताना जीव मुठीत घेऊन या मार्गावर प्रवास करावा लागत असून मागील 3 वर्षापासून अनेक वेळा प्रयत्न करून ही आश्वासन शिवाय काहीच पदरी पडत नसल्याने मोहा गाव परिसरातील शेकडो विद्यार्थी, युवकांनी सार्वजनिक बांधकाम विभाग अंबाजोगाई येथे दि 20 जानेवारी रोजी ठिय्या करत तीव्र निदर्शने केली. युवकांची आक्रमकता आणि प्रशांचे गांभीर्य पाहता या रस्त्याचे अद्यावतीकरण करण्याचे कार्य आदेश बांधकाम विभागाने पारित केल्याने ही निदर्शने स्थगित करण्यात आली आहेत. आदेश पारित होऊन ही 2-3 महिन्याचा काळ लोटला असून ही रस्त्याचे काम प्रलंबित असल्याने भारतीय लोकशाहीवादी युवा संघटना (डीवायएफआय) च्या नेतृत्वाखाली परिसरातील गावातील युवकांनी गुरुवार दि 16 पासून दोन्ही मार्गाला जोडणाऱ्या छत्रपती संभाजी महाराज चौक म्हतारगाव फाटा कांनापूर ता-धारूर या ठिकाणी रखरखत्या उन्हात बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू केले असून मागणी लवकरात लवकर न सोडविल्यास या पेक्षा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा यावेळी संघटनेचे विशाल देशमुख, सुदाम शिंदे, प्रवीण देशमुख, विष्णुपंत देशमुख, सुनील शिंदे, परळी तालुकाध्यक्ष विजय घुगे, सिद्राम सोळंके यांच्यासह उपस्थित युवकांनी दिला आहे.

# रामेश्वरवाडी शाळेची अभिमानास्पद कामगिरी ; मंथन परीक्षेत विद्यार्थी अव्वल

**■ बीड प्रतिनिधी**

मंथन जनरल नॉलेज परीक्षा 2026 मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, रामेश्वरवाडी येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत शाळेचा लौकिक वाढवला आहे. संपूर्ण महाराष्ट्रात दिनांक 1 फेब्रुवारी 2026 रोजी आयोजित करण्यात आलेल्या या परीक्षेत विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला होता. नांदूर घाट परिसरातील विद्यार्थ्यांसाठी ही परीक्षा नांदूर येथे पार पडली.या परीक्षेत मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान आणि बुद्धिमत्ता या विषयांचा समावेश होता. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक वातावरण मिळावे व त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळावी या उद्देशाने या परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. रामेश्वरवाडी शाळेतील विद्यार्थ्यांनी या परीक्षेसाठी मनापासून तयारी केली. मंथन पुस्तक व प्रश्नपत्रिका संच यांचा सखोल अभ्यास करून विद्यार्थ्यांना सक्षम बनवण्यात आले. यासाठी शाळेतील शिक्षक श्री. अशोक खोसे सर, श्रीमती वाघ मॅडम, श्री. प्रशांत सुरवसे तसेच श्रीमती मुंडे मॅडम (ट्रेनी शिक्षक) यांनी विशेष मार्गदर्शन केले. या मेहनतीचे फलित म्हणून इयत्ता दुसरीतील चि. रिषभ अमोल धन्वे यांनी केंद्रातून प्रथम क्रमांक मिळवून उज्ज्वल यश संपादन केले, तर इयत्ता चौथीतील कु. प्रणिता प्रदीप हांगे हिने केंद्रातून तृतीय क्रमांक पटकावला.या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समिती तसेच रामेश्वरवाडी गावकऱ्यांच्या वतीने विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या यशामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



## जाहिर प्रगटन

परळी तालुका व आसपासच्या परिसरातील सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, मौजे बागबेट येथील वॉर्ड क्रमांक ३ मधिल जागा 1) सुग्रीव महादेव गिते यांची जागा 20 × 15

2) महादेव बारिकराव गित्ते यांची जागा उत्तर दक्षिण २० फुट पुर्व पश्चिम 15 फुट व आत्माराम नारायण गीते यांची जागा उत्तर दाक्षिम २० फुट व पुर्व पश्चिम 15 फुट तिन्ही घर जागा खरेदीचा ठराव करणारे नाशीकेत संभाजी गिते यांना केला असुन वरील जागेसंदर्भात ज्याचा कोणाचा कसल्याही प्रकारचा हक्क, संबंध असेल तर त्यांनी 10 दिवसात आक्षेप दाखल करावा.

मुदतीत आक्षेप न आल्यास जागेची खरेदी करुन घेतली जाईल. त्यानंतर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही. सबब हे जाहिर प्रगटन माहितीस्तव देण्यात येत आहे.

**दि. 16/4/2026**
**ॲड. पी. एस. सातभाई**
**मा. 9422741721**

जाहिर प्रगटन देणार

**नाशिकेत संभाजी गित्ते**

**मो 9423776505**

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
Last page
बीड, शुक्रवार, 17 एप्रिल 2026

# थर्ड पार्टी मॉनिटरिंगच्या माध्यमातून प्रदूषण नियंत्रणाची काटेकोर अंमलबजावणी करणार – ना.पंकजाताई मुंडे

## विधानसभेत दिलेल्या आश्वासनाची पूर्ती ; मुंबईत घेणार आढावा बैठक








**चंद्रपूर | प्रतिनिधी**

जिल्ह्यातील प्रदूषणाच्या गंभीर प्रश्नावर विधानसभेत आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी उपस्थित केलेल्या अर्धा तास चर्चेसह विविध संसदीय आयुधांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करत आज चंद्रपूर जिल्ह्यात सविस्तर प्रदूषण पाहणी दौरा केला. या दौऱ्यामुळे चंद्रपूरच्या प्रदूषण प्रश्नावर राज्य सरकारची ठोस भूमिका आणि पुढील कारवाईची दिशा स्पष्ट झाली आहे.

या पाहणी दौऱ्यादरम्यान मंत्री पंकजाताई मुंडे यांनी आ मुनगंटीवार यांच्या सह ऊर्जानगर वसाहत परिसरात वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड आणि चंद्रपूर महा औष्णिक विद्युत केंद्र यांच्या कोळसा हाताळणी प्रकल्प व कोळसा बंकरमुळे निर्माण होणारे प्रदूषण प्रत्यक्ष पाहिले. उघड्यावरून वाहून नेला जाणारा कोळसा, हवेत उडणारी राख व धूर यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याचे त्यांनी निरीक्षण केले.

यानंतर त्यांनी बेलसणी परिसरातील कोल वॉशरीजमुळे होणाऱ्या प्रदूषणाची पाहणी केली. शेतकऱ्यांच्या शेतांवर पडणारी कोळशाची धूळ, पिकांचे नुकसान आणि जमिनीची होत असलेली हानी याबाबत स्थानिकांनी मांडलेल्या समस्या त्यांनी ऐकून घेतल्या. झरपट नदी परिसरातही जाऊन त्यांनी नदीतील प्रदूषण, गाळ साचणे आणि पाण्याच्या गुणवत्तेतील घसरण याचा आढावा घेतला.

### जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक

पाहणी दौऱ्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांचे आभार मानत अत्यंत ठोस व परिणामकारक मागण्या मांडल्या. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, केवळ पाहणीपुरते मर्यादित न राहता या बैठकीचे इतिवृत्त तातडीने अंतिम करून मुंबईत उच्चस्तरीय आढावा बैठक घ्यावी, जेणेकरून निर्णयांची अंमलबजावणी वेळेत होईल.

कोल वॉशरीजमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, तहसीलदार, कृषी विभाग व प्रदूषण नियंत्रण विभागाच्या संयुक्त समितीने दिलेल्या अहवालानुसार तातडीने नुकसानभरपाई देणे आवश्यक आहे, अशी ठाम मागणी त्यांनी केली. यासोबतच प्रदूषण नियंत्रण विभागातील काही अधिकाऱ्यांना संबंधित कायद्याचे पुरेसे ज्ञान नसल्याचे निदर्शनास आणून देत, सक्षम व तज्ज्ञ अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

### झरपट नदीचे पुनरूज्जीवन

झरपट नदीच्या पुनरुज्जीवनासाठी पहिल्या टप्प्यात डीपीआर तयार करण्यासाठी 'निरी' या संस्थेला तातडीने सूचना द्याव्यात तसेच आयआयटी पवई व निरी यांच्या संयुक्त समितीकडून प्रदूषणाबाबत तीन महिन्यांत सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी त्यांनी केली.बैठकीत बोलताना पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी अत्यंत स्पष्ट शब्दांत सांगितले की, चंद्रपूरमध्ये प्रदूषणाची तीव्रता प्रचंड आहे, हे आज प्रत्यक्ष पाहणीदरम्यान जाणवले. काही ठिकाणी प्रदूषण लपवण्याचा प्रयत्न होत असल्याचेही दिसून आले; मात्र प्रदूषण लपवून चालणार नाही, अशा प्रकारांना आम्ही अजिबात सहन करणार नाही.शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होत असताना त्यांना नुकसानभरपाई न देण्याचा प्रकार गंभीर असून तो खपवून घेतला जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. दौऱ्यात दिलेल्या सर्व सूचनांची ठराविक कालमर्यादेत अंमलबजावणी होईल यावर स्वतः लक्ष ठेवणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, तसेच थर्ड पार्टी मॉनिटरिंगद्वारे प्रदूषण नियंत्रणाची काटेकोर अंमलबजावणी केली जाईल, असे सांगत त्यांनी प्रशासनाला स्पष्ट संदेश दिला.झरपट नदीच्या खोलीकरण व सौंदर्यीकरणासाठी महानगरपालिकेने तातडीने पावले उचलावीत, तसेच नदी पुनर्जीवन प्राधिकरण स्थापन होताच इरई व झरपट या नद्यांचा पहिल्या टप्प्यात समावेश करण्यात येईल, अशी घोषणाही त्यांनी केली.या बैठकीस जिल्हाधिकारी वसूमना पंत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, महापौर संगीता खांडेकर, मनपा आयुक्त आकुनोरी नरेश तसेच राहुल पावडे, बंडू गौरकर आदींची उपस्थिती होती. चंद्रपूरच्या प्रदूषणाच्या प्रश्नावर आता केवळ चर्चा न राहता ठोस कृतीकडे वाटचाल सुरू झाल्याचे या दौऱ्यामुळे स्पष्ट झाले आहे.

# "मराठी उद्योजक भरत गीते यांची यशोगाथा हार्वर्ड बिझनेस स्कुलच्या अभ्यासक्रमात"







**मुंबईः** तौरल इंडिया, ही ॲल्युमिनियम सँड कास्टिंग क्षेत्रातील आघाडीची कंपनी, यांचा समावेश जगातील प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थांपैकी एक असलेल्या हार्वर्ड बिझनेस स्कूलच्या केस स्टडीमध्ये करण्यात आला आहे. या माध्यमातून तौरल इंडिया जागतिक स्तरावर अभ्यासल्या जाणाऱ्या निवडक कंपन्यांच्या यादीत स्थान मिळवणारी कंपनी ठरली आहे.

ही केस स्टडी तौरल इंडियाचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी भरत गीते यांच्या नेतृत्वाखाली उभारलेल्या उच्च-प्रिसिजन ॲल्युमिनियम कास्टिंग व्यवसायाच्या प्रवासावर आधारित आहे. जर्मनीस्थित Thoni Alutec या कंपनीसोबतच्या संयुक्त उपक्रमातून २०१६ साली सुरू झालेल्या या प्रवासाचा मागोवा या अभ्यासात घेण्यात आला आहे. ऊर्जा, रेल्वे, संरक्षण आणि एरोस्पेस यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांना सेवा देणाऱ्या जागतिक स्तरावरील उत्पादन व्यासपीठापर्यंत झालेल्या कंपनीच्या प्रगतीचा यात समावेश आहे.

प्राध्यापक व्ही. जी. नारायणन यांनी ही केस स्टडी तयार केली असून, परंपरागत औद्योगिक पार्श्वभूमी किंवा नेटवर्क नसतानाही पहिल्या पिढीतील उद्योजक जागतिक स्तरावरील उद्योग कसा उभारू शकतात, याबाबत महत्त्वपूर्ण अंतर्दृष्टी यातून मिळते.

या संदर्भात प्रा. व्ही. जी. नारायणन म्हणाले, “तौरल इंडियाचा प्रवास उदयोन्मुख बाजारपेठेत उत्पादन क्षमता उभारण्यासाठी आवश्यक असलेल्या घटकांवर प्रकाश टाकतो. जागतिक सहकार्य आणि स्थानिक अंमलबजावणी यांच्या संगमातून सक्षम व जागतिक स्तरावर स्पर्धात्मक उद्योग कसा उभा राहू शकतो, याचे हे उदाहरण आहे.”

तौरल इंडियाचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी भरत गीते म्हणाले, “हार्वर्ड बिझनेस स्कूलमध्ये केस स्टडी म्हणून निवड होणे हा आमच्यासाठी अत्यंत अभिमानाचा आणि नम्र करणारा क्षण आहे. आमचा प्रवास मूलभूत तत्त्वांवर आधारित असून, मर्यादांवर मात करत भारतीय उत्पादन जागतिक दर्जाचे बनू शकते, हे सिद्ध करण्याचा आहे. योग्य दृष्टिकोन, शिस्त आणि भागीदारी यांच्या आधारे भारतासाठी आणि जगासाठी उच्च-गुणवत्तेचे, प्रिसिजन-आधारित अभियांत्रिकी उपाय आणि टिकाऊ उत्पादन मूल्य निर्माण करता येते, हा आमचा विश्वास अधिक दृढ झाला आहे.”

२०१६ मध्ये स्थापना झालेली तौरल इंडिया आज दोन उत्पादन प्रकल्पांसह विशेषीकृत ॲल्युमिनियम कास्टिंग उत्पादक म्हणून विकसित झाली आहे आणि जागतिक स्तरावर आपली उपस्थिती वाढवत आहे. कंपनीचा हा प्रवास जागतिक पुरवठा साखळ्यांमध्ये होत असलेल्या बदलांचे प्रतिबिंब असून, “चायना +1” धोरणाअंतर्गत भारत प्रगत उत्पादनासाठी महत्त्वाचे केंद्र म्हणून उदयास येत असल्याचे दर्शवतो.

हार्वर्ड बिझनेस स्कूलची ही केस स्टडी मुंबई येथे उद्योग, धोरण आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत एका विशेष कार्यक्रमात अधिकृतपणे सादर करण्यात आली.

# बी. रघुनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयास विविध 48 ग्रंथ भेट

**परभणी (प्रतिनिधी) :-**

सुनिल पुष्पाबाई सिताराम रावळे, सहाय्यक अधीक्षक, परीक्षा (वाणिज्य) विभाग, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या वतीने दि.11/04/2026 रोजी स्वखर्चातुन बी. रघुनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परभणी, ता. जि. परभणी या महाविद्यालयास रू.09,970 (रु.नऊ हजार नऊशे सत्तर केवळ) रुपयांचे क्रमिक अभ्यासक्रम, सामाजिक चळवळीची त्याच प्रमाणे कथा संग्रह इत्यादी स्वरुपाची विविध 48 ग्रंथ भेट देण्यात आली.

बी. रघुनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परभणी, ता. जि. परभणी येथील प्रा. डॉ. आर. एस. देशमुख हे उपस्थित होते. मा. डॉ. एम. के. पाटिल, प्र. अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान, मा. हुशारसिंग साबळे, प्र. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या हस्ते सदर ग्रंथ भेट देण्यात आले विशेष म्हणजे मी मानलेल्या माझ्या आठ गुरु पैकी दोन गुरु महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती निमित्त हे ग्रंथ प्रा. डॉ. आर. एस. देशमुख यांना भेट दिले आहेत यावेळी डॉ. ए. व्ही. सरोदे, मॅनजर श्री अमित मेश्राम, महाराष्ट्र ग्रामीण बैंक, अब्दुल बशीर अब्दुल मजिद, श्री. दिपक दुधाळे, श्री. सुनील ढाले, सहाय्यक अधीक्षक, शिष्यवृत्ती (लेखा) विभाग, श्री. प्रकाश मुपडे, श्री. विनायक जाधव, श्री. सुधाकर शिंदे श्री. बळीराम चित्ते, गजानन हंबर्डे, श्री. योगेश चवरे हे कर्मचारी उपस्थित होते.

ॲड. अशोक सोनी; श्री. ओमप्रकाश डागा श्री सतिश झरकर; श्री किशोर मंत्री श्री अनिल हराळ; महाविद्यालयाचे प्राचार्य डा. विलास सोनवणे यांनी ग्रंथभेट देणाऱ्यांचे आभार मानून विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धीसाठी हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

# कु.आर्या भातंब्रेकर हिचे दहावीत ९१ टक्के गुणांसह घवघवीत यश : सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव

**परळी वैजनाथ | प्रतिनिधीः**




केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) घोषित केलेल्या दहावीच्या निकालानुसार छत्रपती संभाजीनगर येथील पोदार इंटरनॅशनल स्कूलची विद्यार्थिनी कु.आर्या अनिरुद्ध भातंब्रेकर हिने ९१ टक्के गुण मिळवून दैदीप्यमान यश संपादन केले आहे. आर्याच्या या यशामुळे तिचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

कु.आर्या ही निवृत्त गटशिक्षणाधिकारी कै.अशोकराव भातंब्रेकर यांची नात असून, तिला सुरुवाती पासूनच अभ्यासाची गोडी आहे. सातत्यपूर्ण मेहनत आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे तिने नव्वदीचा टप्पा पार केला आहे. आर्याच्या या यशाबद्दल कुटुंबीयांनी आनंद व्यक्त केला.आर्याने आपल्या यशाचे श्रेय आई-वडील, आणि शिक्षकांना दिले आहे. तिच्या या यशाबद्दल शाळेचे प्राचार्य, शिक्षक तसेच नातेवाईक आणि मित्र परिवाराकडून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# कपिलधार येथे दि.३ मे रोजी पंचाक्षर ज्ञानोदय वीरशैव प्रेरणा शिबिराचे आयोजन

**परळी (प्रतिनिधी)**



आजच्या या धकाधकीच्या आणि उपभोगवादी वृत्तीला प्रेरणा, प्रोत्साहन देणाऱ्या वातावरणात मनुष्याला शांतता, स्थैर्य, समाधान प्राप्त करण्याचे मार्ग संकुचित होत आहेत. अशा विपरीत परिस्थितीत या सर्वांचे पुनर्जीवन करण्यासाठी संत शिरोमणी शिवयोगी श्री मन्मथ स्वामी यांच्या संजीवन समाधीने पावन अशा श्री क्षेत्र कपिलधार मांजरसुंबा येथे रविवार दि. ३ मे रोजी सकाळी १० ते ०५ एकेदिवशी बौध्दिक चिंतन शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे

सहभागी होऊ इच्छिणाऱ्या तरुणांना पूर्व नोंदणी फॉर्म भरून आपली सहभागीता निश्चित करता येईल. या करिता आपणा सर्वांना आग्रहाचे निमंत्रण या वैचारिक मेजवानीत खालील विषयांवर मार्गदर्शन होणार आहे.यात कुटुंब, समाज व राष्ट्र निर्माणात युवाशक्तीचे महत्त्व या विषयावर श्री गोरक्षनाथ आबुज यांचे व्याख्यान होणार आहे.

संयोजक, शिव शंभू विचार मंच, देवगिरी प्रांत (वेळ सकाळी १०:०० ते ११:३०) व्यसनमुक्त स्वास्थ्य संवर्धनात आपले योगदान

वक्ते : श्री लक्ष्मण भैय्या भंडारी, (वेळ १२:०० ते ०१:३०), संत साहित्य काळाची गरज वक्ते :- शि.भ.प. श्री निलेश मुरगे खानापूरकर (वेळ दुपारी २:३० ते ४:००),समारोप व प्रश्नोत्तरी

वक्ते श्री ष. ब्र. १०८ डॉ. विरुपाक्ष शिवाचार्य महाराज होणार असुन सहभागी होऊ इच्छिणाऱ्या तरुणांनी गुगल फॉर्म दिनांक ३० एप्रिल २०२६ पर्यंत भरावा असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

